**Dr. Kirit Somaiya**
**B.Com, FCA, Ph.D.**
*Ex-Member of Parliament*
*Member, BJP National Executive*
*Vice President, BJP Maharashtra*

**Bharatiya Janata Party**
**भारतीय जनता पार्टी**

मुंबई - गुरुवार

दि.२६.७.२००७

## २६ जुलै - मिठी यज्ञ - ४५० मृतांचे दुसरे वर्ष श्राध्द

२६ जुलै मिठी नदी किना-यावर मृत पावलेल्या ४५० लोकांचे दुसरे सामुहिक वर्ष श्राध्द आज क्रांती नगर, कुर्ला येथे करण्यात आले. भारतीय जनता पार्टीचे नेते माजी खासदार डॉ.किरीट सोमैया यांनी 'मिठी यज्ञ'ही याप्रसंगी केला. क्रांती नगर येथील मिठी रहिवासी संघाचे पदाधिकारी श्री गणेश साळुंखे, श्री किशोर सोनार, श्री साहिल सुधाम, श्री महेश किंदळेकर तसेच स्थानिक नगरसेवक श्री सिताराम तिवारी व महापालिका भाजप गटनेते श्री भालचंद्र शिरसाट यांनीही याप्रसंगी मिठी नदीतील मृतात्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

मिठी नदी योजनेला होत असलेला विलंब व दिरंगाईमुळे यावर्षीही थोडयाशा पावसात ५ लोक वाहून गेले. 'शासन व प्रशासनाने इतक्या मृत्युनंतरही धडा घेतलेला नाही''. २४ महिन्यात काहीही बदल नाही. डॉ.किरीट सोमैया यांनी श्रध्दांजली वाहताना सांगितले की, १३५९ कोटींच्या मिठी योजनेसमोर आतापर्यंत फक्त ६५ कोटी खर्च झाले आहेत.

महाराष्ट्र शासनाने समित्या नेमल्या – चितळे समिती, सत्यशोधक समिती, सीडब्ल्युपीआरएस, आयआयटी तसेच कॅग (लूंदे) यांचे अहवालही आले, त्याला शासनाने मंजुरीही दिली. परंतु अंमलबजावणी ''शुन्य''. १६ कोटींच्या ब्रिमस्टॉवॅड अहवालाच्या अंमलबजावणीची घोषणा सालाबादप्रमाणे यावर्षीही २६ जुलैच्या निमित्ताने शासनाने केली. परंतु हकीगत म्हणजे गेले २४ महिने मुंबईकरांकडून २ लाख १३ हजार कोटी करांच्या रुपाने केंद्र शासनाने वसूल केले, त्याच्यासमोर एक छदामही मुंबईला दिला नाही.

राज्य व केंद्र शासनाने मिठीबरोबर ओशिवरा, दहिसर, पोईसर नद्यांच्या पुनर्निमाणाचे काम युध्दपातळीवर पूर्ण करावे अशी मागणीही डॉ.किरीट सोमैया यांनी याप्रसंगी केली.

( मिलिंद दोंदे )
प्रसिध्दी सचिव

**BJP Office :** ● 11, Ashoka Road, New Delhi 110 001

➔**Please Reply :** 9C, Neelam Nagar, Mulund (E), Mumbai 400 081- Tel21639649/21634152
(M)9869220027 ● Fax : 21637432 - Email: kirit@vsnl.in, neelamnagar@rediffmaill.com
Website : www.kiritsomaiya.com